छोटा मासा

जो पळून गेला.

जॉनसन

मराठी : अश्विनी बर्वे

छोटा मासा

जो पळून गेला

जॉनसन

खूप जुनी गोष्ट आहे.
एक छोटा मुलगा होता.
ज्याला मासे पकडायला खूप आवडे.

पुढच्या पानावर बघा
तो कुठे जात आहे.

तो रोज मासे पकडायला जात असे.

पण त्याने आजपर्यंत एकही मासा
पकडला नव्हता..



हो थंडी मुळे त्याला सर्दी झाली होती.

बस एक दिवस गेला.
आणि कदाचित तुम्ही त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवणार नाही.

एक दिवस त्याने मातीतून काही गांडूळ काढले आणि एका डब्यात ठेवले. मग त्याने झाडाची एक लांब फांदी घेतली ती झाली त्याची मासे पकडण्याचा गळ.

त्याने फांदी आपल्या खांद्यावर ठेवली आणि तो मासे पकडायला निघाला..

तो आपल्या आवडीच्या ठिकाणी पोहचला जिथं त्याने पहिले कधी मासे पकडले नव्हते.त्याने गळाला गांडूळ लावले, आणि मग गळ पाण्यात टाकला. मग तो वाट पाहू लागला.

तो खूप वेळपर्यंत वाट बघत होता.



मग त्याने एक भीमकाय मासा
येतांना पाहिला.

तो मासा चारी बाजूला वो
गोल-गोल, गोल-गोल,
गोल-गोल, गोल-गोल फिरत
राहिला.

बिलकुल अशा प्रकारे.



त्याने गळाला लावलेले गांडूळ पाहिले. मग त्याने आपली शेपटी हलवली. मग तो मासा चारी बाजुला गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल घूमी.

आणि मग तो जिथून आला होता तिकडे परत गेला..

बिलकुल असेच. हो त्याने हेच केलं..



छोटा मुलगा वाट बघत राहिला,
वाट बघत राहिला.

तो फक्त वाट बघत राहिला.



मग एक मोठ्ठा मासा आला.

तो मासा चारी बाजुला गोल-गोल,
गोल-गोल, गोल-गोल,
गोल-गोल फिरत राहिला.

अशा प्रकारे



त्याने गळाला लावलेलं गांडुळ बघितले. मग त्याने आपली शेपटी हलवली.

मग तो मासा चारी बाजुला गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल फिरला.

आणि मग तो जिथून आला तिथं परत गेला..

बिलकुल अशा प्रकारे.

हो, त्याने तेच केलं.



छोटा मुलगा वाट बघत
राहिला, वाट बघत राहिला.

तो फक्त वाट बघत राहिला.

मग एक मोठ्ठा मासा आला.

तो मासा चारी बाजुला
गोल-गोल,
गोल-गोल, गोल-गोल,
गोल-गोल फिरत राहिला.
.

अशा प्रकारे.



त्याने गळाला लावलेलं गांडुळ बघितले. मग त्याने आपली शेपटी हलवली.

मग तो मासा चारी बाजुला गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल फिरला.

आणि मग तो जिथून आला तिथं परत गेला..

बिलकुल अशा प्रकारे.

हो, त्याने तेच केलं

छोटा मुलगा वाट बघत
राहिला, वाट बघत राहिला.

तो फक्त वाट बघत राहिला.



मग एक छोटा मासा आला, तो
मासा चारी बाजूला
गोल-गोल, गोल-गोल,
गोल-गोल, गोल-गोल फिरत
राहिला.

अशा प्रकारे, हो
त्यानेही तेच केलं.

त्याने गळाला लावलेलं गांडुळ बघितले. मग त्याने आपली शेपटी हलवली.

मग तो मासा चारी बाजुला गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल फिरला.

आणि मग तो जिथून आला तिथं परत गेला..

बिलकुल अशा प्रकारे.
हो, त्याने तेच केलं



बिचारा छोटा मुलाने दुःखी होऊन ठरवलं की आता याच्यापुढे मासे पकडायचे नाहीत. मग त्याने खाली बघितलं.

पाण्यात.

त्याने पाण्यात भीमकाय मासा
येतांना परत पाहिला.
तो मासा चारी बाजुला
गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल,
गोल-गोल फिरत राहिला.

त्याने गळाला लावलेलं गांडूळ
बघितलं. त्याने आपली शेपटी हलवली.
मग.

–मग त्याने गांडूळ खाऊन टाकले. त्यानंतर छोट्या मुलाने भीमकाय माशाला पाण्यातून बाहेर ओढले.

आणि त्याला एका टोपलीत ठेवले. जी त्याने झाडाखाली ठेवली होती. या आशेने की कदाचित त्याला एखादा मासा पकडता येईल.

मग त्याने गळाला अजून एक गांडूळ लावले. आणि गळ पाण्यात सोडले. मग तो विशाल मासा परत आला. तो चारी बाजूला गोल गोल फिरला.

त्याने गळाला लावलेलं गांडुळ बघितलं. मग त्याने आपली शेपटी हलवली.

मग-

मग त्याने गांडूळ खाऊन
टाकले. त्यानंतर छोट्या
मुलाने विशाल माशाला
पाण्यातून बाहेर ओढले.

आणि त्याला एका टोपलीत ठेवले.
जी त्याने झाडाखाली ठेवली होती.
या आशेने की कदाचित त्याला
एखादा मासा पकडता येईल.

मग त्याने गळाला अजून एक गांडूळ
लावले. आणि गळ पाण्यात सोडले.
मग तो मोठा मासा परत आला. तो
चारी बाजूला गोल गोल फिरला.

त्याने गळाला लावलेलं गांडुळ
बघितलं. मग त्याने आपली
शेपटी हलवली.
मग...

मग त्याने गांडूळ खाऊन टाकले.
त्यानंतर छोट्या मुलाने मोठ्या
माशाला पाण्यातून बाहेर ओढले.

आणि त्याला एका टोपलीत ठेवले.
जी त्याने झाडाखाली ठेवली होती.
या आशेने की कदाचित त्याला
एखादा मासा पकडता येईल..

मग त्याने गळाला अजून एक गांडूळ लावले आणि गळ पाण्यात सोडले. त्याने वाट बघितली आणि तो वाट बघत राहिला.

आणि तो वाट बघू लागला.

आणि लवकरच छोटा मासा सुद्धा परत आला.

छोटा मासा चारी बाजुला गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल फिरत राहिला.

त्याने गळाला लावलेलं गांडूळ बघितलं आणि त्याने आपली शेपटी हलवली. गांडुळाचा वास घेतला.

छोटा मुलगा खूप शांत बसला आणि विचार करू लागला - घाई कर, छोट्या माशा, लवकर ते गांडुळ खा. मग मी घरी जाईन आणि आई-बाबांना ते सगळे मासे दाखवेन, जे मी पकडले आहेत.

परंतु...

पण छोट्या माशाने गांडुळ खाल्ले नाही. तो बघत राहिला आणि अंदाज घेत राहिला.

मग तो मासा चारी बाजुला गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल, गोल-गोल फिरला.

आणि जिथून आला तिथं परत निघून गेला.

मग छोट्या मुलाने आपल्या टोपलीत तो भीमकाय मासा, विशाल मासा, आणि मोठा मासा ठेवला.

मग तो आपल्या घरी गेला.

जेव्हा तो घरी आला,तेव्हा त्याच्या आईने मासे बघितले. आई, मासे बघून खूप खुश झाली. आईने त्यांना स्वच्छ केले आणि रात्रीच्या जेवणासाठी त्यांना शिजवले.

छोट्या मुलाच्या वडिलांनी विशाल मासा खाल्ला. आईने खूप मोठा मासा खाल्ला आणि छोट्या मुलाने सगळ्यात मोठा भीमकाय मासा खाल्ला कारण तो खूप भुकेला होता. हो त्याने तेच केलं..

जेव्हा ते जेवत होते तेव्हा छोट्या मुलाने सांगितले की त्याने मासे कसे पकडले आणि छोट्या माशाने कसं गांडुळ खाल्ले नाही. मग ते सगळेजण यावर खूप हसले की छोटा मासा कसा पळून गेला.

समाप्त